तालुका, जिल्हा आणि राज्यस्तरावरील बैठकांमध्ये वृक्ष लागवड आणि संगोपन हा मुद्दा स्थायी विषय म्हणून बैठकांच्या विषयसूचीमध्ये आणि क्षेत्रीय स्तरावरील निरक्षण भेटीमध्ये अंतर्भूत करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन

सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग

शासन परिपत्रक क्रमांकः- संकीर्ण-२०१८/प्र.क्र.७३/समन्वय

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२ .
दिनांकः- ११ मे, २०१८.

<u>वाचा</u>:- १. शासन निर्णय,महसूल व वन विभाग क्रमांक्र-साववि-२०१६/प्र.क्र.१३१/फ-११, दि. ३१ मार्च, २०१६.

२. शासन परिपत्रक, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग क्रमांक:- संकीर्ण-२०१६/ प्र.क्र. ५८/समन्वय, दि. २० एप्रिल, २०१६.

३. शासन निर्णय,महसूल व वन विभाग क्रमांक्र-साववि-२०१६/प्र.क्र.८०/फ-११, दि. १० ऑक्टोबर, २०१६.

४. शासन परिपत्रक, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग क्रमांक:- संकीर्ण-२०१६/ प्र.क्र. ५८/समन्वय, दि. ०३ फेब्रुवारी, २०१७.

<u>प्रस्तावना:-</u>

हवामान आणि ऋतूबदल, वाढते तापमान, दुष्काळ आणि पाण्याचे दुर्भिक्ष या नैसर्गिक आपत्तींची दाहकता आणि तीव्रता कमी करण्यासाठी **“हरित महाराष्ट्र”** ही संकल्पना राबविण्याचा महत्वपूर्ण निर्णय शासनाने घेतला आहे. या कार्यक्रमांतर्गत सन २०१७ ते २०१९ या कालावधीत ५० कोटी वृक्ष लागवडीचे उद्दिष्ट ठरविण्यात आले असून, सन २०१७ मध्ये ४ कोटी वृक्षारोपण कार्यक्रमाची अंमलबजावणी झाली आहे. त्याशिवाय सन २०१६ मध्ये दि. १ जुलै, २०१६ या एकाच दिवशी २ कोटी वृक्ष लागवडीचा आगळा वेगळा व महत्वाकांक्षी कार्यक्रम कार्यान्वित करण्यात आला.

२. सन २०१८ आणि सन २०१९ मध्ये अनुक्रमे १३ कोटी आणि ३३ कोटी वृक्ष लागवडीचे उद्दिष्ट आहे. विभागाचे वृक्ष लागवडीचे उद्दिष्ट पूर्णपणे साध्य व्हावे आणि त्याचबरोबर आतापर्यंत लागवड केलेल्या झाडांचे संरक्षण, देखभाल आणि संगोपन उत्तमरितीने होणे हे अत्यंत गरजेचे आहे.

३. महसूल व वन विभागाकडून दि. १ जुलै ते ७ जुलै, २०१७ या कालावधीमध्ये ४ कोटी वृक्षारोपण कार्यक्रमाचे सादरीकरण मा. मंत्रीमंडळासमोर दि. १३ जून, २०१७ रोजी करण्यात आले. त्यावेळी झालेल्या चर्चेनुसार यासंदर्भात करावयाच्या कार्यवाहीबाबत मा. मंत्रीमंडळाने दिलेल्या सहमतीनुसार या परिपत्रकाद्वारे खालील सूचना निर्गमित करण्यात येत आहेत.

परिपत्रक:-

१. सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागांतर्गत क्षेत्रीय स्तरावरील तालुका, जिल्हा आणि राज्यस्तरीय बैठकांमध्ये वृक्ष लागवड आणि संगोपन हा स्थायी विषय म्हणून अंतर्भूत करावा. अशा बैठकांमध्ये वृक्ष लागवडीचा आढावा, या पूर्वी लावलेल्या झाडांचे जिवंत राहण्याचे प्रमाण, मृत झाडांच्या जागी नवीन झाडांची लागवड, पुढील वर्षांमध्ये वृक्ष लागवडीच्या उद्दिष्टाप्रमाणे वृक्षारोपणासाठी स्थळ निश्चिती, रोपांची उपलब्धता, आवश्यक त्या तांत्रिक परिमाणाप्रमाणे, विहित कालावधीमध्ये वृक्ष लागवडीसाठी खड्डे तयार करणे, निधीची उपलब्धता इत्यादी संदर्भात आढावा घेण्यात यावा.

२. अशा बैठकांमध्ये वृक्ष लागवड कार्यक्रमासंदर्भात झालेल्या निर्णयांची नोंद बैठकीच्या इतिवृत्तामध्ये करावी. तसेच इतिवृत्तामध्ये नमूद केलेल्या निर्णयाची झालेली अंमलबजावणी आणि येणाऱ्या अडचणी यासंदर्भात पुढील बैठकीमध्ये चर्चा होऊन क्षेत्रीय अधिकाऱ्यांना येणाऱ्या समस्या आणि अडचणी सोडविण्यासाठी उपाययोजना कराव्या.

३. तालुका, जिल्हा आणि राज्य स्तरावरील जे अधिकारी क्षेत्रीय कामांना भेटी देतील, त्यावेळी विभागांतर्गत वृक्ष लागवडीच्या स्थळांना आवर्जून भेटी देण्याचा कार्यक्रम आयोजित करावा. अशा क्षेत्रीय भेटीच्या वेळी संबंधित प्रशासकीय विभागांतर्गत लावलेल्या झाडांचे संरक्षण योग्यरितीने होते काय, मृत झाडांच्या बदल्यात नवीन झाडे लावली गेली काय, पाण्याची व्यवस्था आणि संरक्षणासाठी मनुष्यबळ इत्यादींची वरिष्ठ अधिकाऱ्यांनी पाहणी करावी. त्याचप्रमाणे येणाऱ्या अडचणी सोडविण्याबाबत उपाययोजना कराव्या.

४. प्रस्तावित वृक्ष लागवडीसाठी निवडलेली स्थळे, आवश्यक त्या परिमाणाचे वृक्ष लागवडीसाठी खड्डे विहित वेळेत तयार करणे आणि अशा स्थळांवर लावण्यात येणाऱ्या झाडांसाठी पाण्याची आणि संरक्षण व्यवस्था, वृक्ष लागवडीसाठी निधीची व्यवस्था, याबाबत देखील पाहणी करुन क्षेत्रीय अधिकाऱ्यांना आवश्यक ते मार्गदर्शन द्यावे.

सदर परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून, त्याचा संकेतांक २०१८०५१११७३५०८४६२२ असा आहे. हे परिपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Siddharth Amrutrao Zalte

Digitally signed by Siddharth Amrutrao Zalte
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Social Justice and Special Assistance Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=dc54b49c6f5c903027053476b3a6ef50b46ff44a7e8b820fef7bfdd100c56194, cn=Siddharth Amrutrao Zalte
Date: 2018.05.11 17:39:00 +05'30'

(सि. अ. झाल्टे)

अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत:-

१. आयुक्त, समाज कल्याण, पुणे.
२. आयुक्त, अपंग कल्याण, पुणे.
३. संचालक, विजाभज संचालनालय, पुणे.
४. महासंचालक, डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी), पुणे.

५. व्यवस्थापकीय संचालक, लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळ, मुंबई.
६. व्यवस्थापकीय संचालक, महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळ, मुंबई.
७. व्यवस्थापकीय संचालक, संत रोहिदास चर्मोद्योग व चर्मकार विकास महामंडळ, मुंबई.
८. व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य अपंग वित्त व विकास महामंडळ, मुंबई.
९. व्यवस्थापकीय संचालक, वसंतराव नाईक विमुक्त जाती, भटक्या जमाती विकास महामंडळ, मुंबई.
१०. व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य इतर मागास वर्ग वित्त व विकास महामंडळ, मुंबई.
११. प्रशासकीय अधिकारी, महाराष्ट्र राज्य सफाई कर्मचारी आयोग, मुंबई.
१२. सर्व सहसचिव/अवर सचिव/कार्यासन अधिकारी, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, मंत्रालय, मुंबई.
१३. निवडनस्ती (समन्वय).